जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2018
तरुण भारत

# वित्त-लेखा विभाग होणार ऑनलाईन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या महत्त्वाच्या वित्त व लेखा समितीचे कामकाज संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने सुरू झाले आहे. नुकतीच कागदविरहित स्वरुपातील बैठक पार पडली. प्रशासकीय बैठकांचे कामकाज गतिमान पद्धतीने होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अशी माहिती प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, केंद्र सरकारच्या 'डिजीटल इंडिया' अभियानाला सकारात्मक प्रतिसाद देऊन बहुतांश प्रशासकीय कामकाज पेपरलेस पद्धतीने करण्यास प्राधान्य दिले आहे. बैठकांच्या कामकाजाचे केवळ संगणकीकरण नव्हे, तर ऑनलाईन पद्धतीने कागद विरहित कामकाज होण्याच्या दृष्टीने पोर्टल निर्माण केले जाईल. त्याला प्रतिसाद म्हणून प्राथमिक टप्प्यात विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागामार्फत आयोजित बैठका या प्रणालीव्दारे होणार आहेत. 'शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन मिटींग मॅनेजमेंट सिस्टीम' ही ऑनलाईन संगणकीय प्रणाली निर्माण करण्यात आली. विद्यापीठातील अधिविभागांना या प्रणालीव्दारे स्वतंत्र लॉग-ईन देण्यात आला आहे. त्यांनी या प्रणालीत प्रवेश करून आपला विषय ऑनलाइन स्वरुपात सादर करावयाचा आहे. बैठकीचे कामकाज ऑनलाइन चालेल आणि संबंधित विषयावर बैठकीत झालेले ठराव संबंधितांना पुन्हा ऑनलाइन स्वरुपातच प्राप्त होतील. या प्रणालीमध्ये विषयानुसार ऑटो-टॅगिंग, कोडिंग, इंडेक्सिंग आदी सुविधा आहेत. त्यामुळे एखाद्या विषय किंवा विभागासंदर्भातील यापूर्वीचे



निर्णय पाहणेही शक्य होणार आहे. त्या दृष्टीने वित्त व लेखा विभागाने सन १९८३ पासूनच्या सर्व बैठकांच्या फाईल स्कॅन करून, त्यांच्या ठरावांचे कोडिंग करून या प्रणालीमध्ये त्याचा समावेश केला आहे. बैठकांचे नियोजन व सुसूत्रीकरण करणेही सोयीचे झाले आहे.

**प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांची माहिती**

'ईझी एन्ड युजफुल' कंपनीच्या विश्वजीत देसाई यांनी या ऑनलाईन सॉफ्टवेअर प्रणालीची निर्मिती केली आहे. तर विद्यापीठाच्या वित्त विभागातील सहाय्यक अधीक्षक नितीन साळोखे यांच्यासह सर्व सहकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

**टप्प्याटप्प्याने सर्व बैठका ऑनलाईन : कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे**

शिवाजी विद्यापीठातील वित्त व लेखा विभागाच्या बैठकांचे कामकाज ऑनलाईन केल्यानंतर पुढील टप्प्यात विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद तसेच अधिसभा आदी महत्त्वाच्या सर्व सभा-बैठकांचे कामकाज ऑनलाईन करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर टप्प्याटप्प्याने या बैठकांचे कामकाजही ऑनलाईन करण्यात येणार आहे.

30 JAN 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## शिवाजी विद्यापीठातील उपक्रम; कल्पनांना चालना देण्याचे प्राध्यापकांचे पाऊल

# 'शुगर'द्वारे अद्ययावत संशोधनाला बळ

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कल्पकता ही संशोधनासाठी अनेकदा महत्त्वाची ठरते. हा धागा लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांनी विविध कल्पना, कल्पकता मांडण्यासाठी शिवाजी युनिर्व्हसिटी ग्रुप फॉर ॲडव्हान्स रिचर्सद्वारे (शुगर) संधी उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठ पातळीवरील हा उपक्रम अभिनव ठरत आहे.

संशोधन क्षेत्रात एकत्रितपणे काम केल्यास ते अधिक प्रभावी ठरते. त्यादृष्टीने विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अनिल घुले यांनी भौतिकशास्त्र



विभागातील निशाद देशपांडे यांच्या चर्चेतून 'शुगर'ची संकल्पना पुढे आली. त्यांनी आपापल्या अधिविभागामधील अन्य प्राध्यापकांसमोर संबंधित संकल्पना मांडली. त्यातून वर्षभरापूर्वी 'शुगर'ची सुरुवात झाली. त्यात दर महिन्याच्या शनिवारी अथवा सर्वांना सोईस्कर ठरणारी एखादी वेळ निश्चित करून त्यादिवशी या दोन्ही अधिविभागांतील प्राध्यापक एकत्रित येतात. याठिकाणी ते आपआपल्या संशोधनाबाबतची मांडणी करतात, त्यातील विविध मुद्द्यांवर चर्चा करून एकमेकांना काही सूचना करतात. या उपक्रमाचा चांगला परिणाम झाला आहे. त्यातून अद्ययावत संशोधनाच्या दिशेने प्राध्यापकांची पावले पडत आहेत.

## सर्वांना सहभागाची संधी

आम्ही 'शुगर'द्वारे विद्यापीठ पातळीवरील संशोधनाला बळ देण्याच्या अनुषंगाने टाकलेले पाऊल यशस्वी ठरत आहे. या उपक्रमाची कुलगुरुंनी दखल घेतली आहे. त्यांनी या उपक्रमाची व्याप्ती वाढवावी. त्यासह संशोधनाला अधिक चांगल्या पद्धतीने चालना देण्याच्या अनुषंगाने उपक्रम राबविण्यास देखील सुचविले असल्याचे रसायनशास्त्र विभागातील डॉ. अनिल घुले यांनी सांगितले. या प्रकल्पाचे चांगले परिणाम झाले आहेत. प्रा. एस. एस. कोळेकर यांना दक्षिण कोरियाची ब्रेनपूल फेलोशीप, निशाद देशपांडे यांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसची यंग असोसिएटस्, तर मला इन्साची फेलोशीप मिळण्यात या उपक्रमाचा चांगला उपयोग झाला. त्यासह विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय संशोधनविषयक परिषदांमध्ये शोधनिबंध सादर करण्यास उपयुक्त ठरले आहे. 'शुगर' हे सर्वांसाठी खुले आहे. त्यात सहभागी होऊन लोकोपयोगी ठरणारी एखादी कल्पना कोणीही मांडू शकते.

जनसंपर्क कक्ष
30 JAN 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पार्क फिल्म फेस्टिव्हल आज

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग तसेच एमए मास कम्युनिकेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने तृतीय 'स्पार्क फिल्म फेस्टिव्हल'चे आयोजन विद्यापीठाच्या निलांबरी हॉलमध्ये मंगळवार (दि. ३०) रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात माहितीपट तज्ज्ञ शोएब शेख हे यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. शैलेश कोरे दिग्दर्शित 'फांझर' या लघुपटाचा प्रिमियर शो यावेळी होणार आहे.

**शिवाजी विद्यापीठात आयोजन १५ लघुपटांचा समावेश**



शिवाजी विद्यापीठात गेल्या तीन वर्षांपासून 'स्पार्क फिल्म फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात येते. या फेस्टिव्हलमध्ये पत्रकारितेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या माहितीपट तसेच लघुपटांचे सादरीकरण करण्यात येते. त्यातुन विद्यार्थ्यांच्या संकल्पनांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे अशी अपेक्षा आहे.

मंगळवारी होणाऱ्या फेस्टिव्हलमध्ये दहा माहितीपट आणि पाच लघुपटांचे सादरीकरण होईल. विद्यार्थ्यांनी या माहितीपटांतून जलसंधारणासह विविध सामाजिक विषय हाताळले आहेत. विविध विषयांवरील लघुपट आहेत. फेस्टिव्हलमध्ये सादर होणारे लघुपट आणि माहितीपट सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.


30 JAN 2018 तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. रणधीर शिंदे यांना 'अनंत काणेकर पुरस्कार'

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या दिवाळीअंक स्पर्धेचा (२०१७) निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यामध्ये डॉ. रणधीर शिंदे यांच्या 'शब्दशिवार" या दिवाळी अंकातील 'येडापीसा वारा चिकटलेला जन्मभर तुझ्या देहाला" या लेखाला उत्कृष्ट ललित लेखाचा



'अनंत काणेकर पारितोषिक" पुरस्कार जाहिर झाला आहे.

डॉ. रणधीर शिंदे सध्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्काराची माहिती या स्पर्धेचे निमंत्रक आणि ग्रंथालय विभागाचे कार्यवाह वि. दा. पिंगळे यांनी दिली. या स्पर्धेसाठी यावर्षी महाराष्ट्रातून १८८ दिवाळी अंक आले होते.

त्यातून 'शब्दशिवार" दिवाळी अंकाची पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. अविनाश सांगोलेकर, विनया देसाई, प्रभा सोनवणे, प्रतीक पुरी यांनी काम पाहिले. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार (दि.१ फेब्रुवारी) सायंकाळी ६.३० वाजता पुण्यातील साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात होणार आहे. सुप्रसिद्ध चित्रकार रवी परांजपे आणि पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2018
तरूण भारत

# शारदाबाई पवार अध्यासन केंद्रातर्फे विद्यापीठात उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कै. श्रीमती



शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्राच्या वतीने बुधवार (३१) रोजी 'स्थानिक राजकारणातील स्त्रीया :काल व आज' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी ११.३० वाजता या कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. 'शारदाबाई गोविंदराव पवार यांचे व्यक्तिमत्व व पुणे लोकल बोर्डातील कार्य' या विषयावर डॉ. पाटील यांचे बीजभाषण होईल. प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तरी या कार्यशाळेला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2018
पुढारी


# शारदाबाई पवार अध्यासनातर्फे उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने 'स्थानिक राजकारणातील स्त्रिया : काल व आज' या विषयावर बुधवारी (दि.३१) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांचे बीजभाषण होईल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहे. कार्यक्रम छत्रपती शाहू सिनेट हॉल येथे होणार असल्याचे प्रसिद्धीस दिले आहे. या कार्यशाळेत महिला ग्रामपंचायत सदस्य अनुभव सांगणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2018
सकाळ



कोल्हापूर : विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर पथनाट्य सादर करताना विद्यार्थी.

## विद्यापीठात बेटी बचाओ प्रभातफेरी

कोल्हापूर, ता. २९ : राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात बेटी बचाओ अभियानांतर्गत प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. प्रभातफेरीची सुरवात मुख्य इमारतीपासून झाली. प्रारंभी पोवाडा, लाठीकाठी व पथनाट्य आदी कार्यक्रम झाले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. आर. मोरे, अजित चौगुले, डॉ. जगन कराडे प्रमुख उपस्थित होते. पथनाट्यासाठी अवधूत गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यात सुहास रोमणे, पूनम पाटील, आकाश पाटील, विक्रांत भोपळे, स्नेहल पट्टणशेट्टी, प्रीती रेडेकर, दीपाली राठोर आदी विद्यार्थी सहभागी होते. विविध अधिविभागातील विद्यार्थिनींनी विविध वेशभूषा परिधान केल्या होत्या. अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. या वेळी सर्व अधिविभाग प्रमुख, सर्व अधिविभाग समन्वयक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2018
तरूण भारत

# 'स्त्रियांना स्थान दिले पाहिजे हे महात्मा फुले यांनी ओळखले'

**कोल्हापूर :** धर्मसंस्थेमध्ये स्त्रीयांना स्थान नाही, दुय्यम भुमिका त्यांच्यावर लादण्यात आली आहे. हे महात्मा फुलेंनी सप्रमाण सिध्द केले व स्त्रीयांना केवळ समानतेची वागणूक नव्हे तर उच्च स्थान दिले पाहीजे, असा आपल्या लिखाणातून आग्रह धरला होता, असे मत प्रा. अरुण शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील कै. पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेत "महात्मा फुले व सार्वजनीक सत्यधर्म व सद्यस्थिती" या विषयावर ते बोलत होते. हे व्याख्यान आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत शिक्षणशास्त्र विभागाच्या सभागृहामध्ये आयाजित करण्यात आले होते. डॉ. शिंदे म्हणाले, महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माची वैशिष्ठये सांगुन सर्वधर्म समभाव मानणारा हा धर्म आहे. सत्यशोधक समाजाने कर्मकांडे डोळसपणे नाकारावीत व बुध्दिप्रामण्यवादाने सामर्थ्यवान व्हावे ही अपेक्षा महात्मा फुलेंनी व्यक्त केली होती. अभिजीत साळुंखे, विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा, प्रा. यशोधन बोकील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2018
सकाळ


श्वेता पाटील


ज्योती लोखंडे


ऋतुजा पाटील


पूनम उपाध्ये

# विद्यापीठ गुणवत्ता यादीत शरद इंजिनिअरिंगचा झेंडा

## श्वेता पाटील प्रथम : पुन्हा एकदा गुणवत्ता सिद्ध

सकाळ वृत्तसेवा

दानोळी, ता. २९ : यड्राव येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रिकल विभाग गुणवत्ता यादीतील पहिले तीन क्रमांक मिळविले. श्वेता मलगोंडा पाटील हिने प्रथम क्रमांक तर इतर विद्यार्थीही गुणवत्ता यादीत झळकले. शरद इन्स्टिट्यूटने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकण्याची परंपरा कायम ठेवून तंत्रशिक्षणातील उच्च गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

मे २०१७ ला झालेल्या परीक्षेत श्वेता पाटील हिने ८२.५६ टक्के गुण मिळवून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात प्रथम क्रमांक मिळविला. ज्योती पंडित लोखंडे हिने (८२.५०) द्वितीय तर ऋतुजा लक्ष्मण पाटील (८१.२५) हिने तृतीय क्रमांक मिळविला. कॉम्प्युटर सायन्समधील पूनम अभयकुमार उपाध्ये (८१.०६) हिने तिसरा तर सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये अक्षय राजकुमार उपाध्ये (८२.५६) याने चौथा क्रमांक मिळविला. सुहास राजाराम पाटील (८०.०६) याने टक्के गुण मिळवून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात विद्यापीठात सातवा क्रमांक मिळविला आहे.


अक्षय उपाध्ये


सुहास पाटील

गेल्या सात-आठ वर्षांमध्ये 'शरद पॅटर्न'चा अवलंब करून सर्वांगीण विकास, उच्च गुणवत्तेची निर्मिती आणि शिस्तप्रिय संस्कारक्षम पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम शरद इन्स्टिट्यूट करीत आहे. शरद इंजिनिअरिंगचे विद्यार्थी उत्कृष्ट गुण मिळवून प्रत्येक वर्षी विद्यापीठ गुणवत्ता यादीत येतात.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी कौतुक केले.

एस. ए. खोत, उपप्राचार्या सौ. एस. पी. कुलेंकर, डिन प्रा. शशिराज चौगुले, प्रा. एस. डी. पाटील, प्रा. के. एन. रोडे, डॉ. किरण भगाटे, विभाग प्रमुख प्रा. मंगेश कुलकर्णी, प्रा. वेंकटेश शंकर, डॉ. बी. एस. पाटील, डॉ. एन. सी. हिरेमठ, प्रा. के. ए. कुपाडे, डॉ. के. व्ही. खोत यांच्यासह सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.